महाराष्ट्र शासन

# शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय , अवसरी खुर्द

## तालुका – आंबेगाव जिल्हा पुणे ४१२४०५

दूरध्वनी क्र. : ०२१३३ २३०५८१ संकेतस्थळ: www.gcoeara.ac.in

ईमेल: office.gcoeavasari@dtemaharashtra.gov.in

**परिपत्रक:** जावक = 836 **दिनांक: १४.०३.२०२४**

महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी,शिक्षक अधिकारी तसेच शिक्षकेतर कर्मचारी यांना कळविण्यात येते की, भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयाने तरुणांसाठी १० फेब्रुवारी २०२४ रोजी राष्ट्रीय ई-ग्रंथालय (राष्ट्रीय अंकीय ग्रंथालय), राष्ट्रीय अंकीय ग्रंथालय(राष्ट्रीय डिजिटल ग्रंथालय) सुरू केले आहे.

हा एक केंद्र सरकारच्या शिक्षण मंत्रालयाचा अग्रगण्य उपक्रम असून त्या ई-ग्रंथालयात विविध प्रकारच्या ज्ञान साहित्याचा तसेच विविध कथांचा संग्रह असून ते एक प्रकारचे राष्ट्रीय ज्ञान भांडार आहे. सदरील अंकीय ग्रंथालयातील उपलब्ध ज्ञान भांडाराचा (वाचनसाहित्याचा) मुले तसेच किशोरवयीन मुले यांचेसाठी जास्तीत-जास्त उपयोग होईल. सदरील राष्ट्रीय ग्रंथालयातील वाचन साहित्य ऑनलाईन पद्धतीने वाचकांना अखंड उपलब्ध आहे. सदरील ई-ग्रंथालयातील वाचनसाहित्याने मुलांमध्ये वाचनाची सवय विकसित होईल. या राष्ट्रीय अंकीय ग्रंथालय सुरु करण्याचा उद्देश तरुण भारतीयांमध्ये त्यांना भारतीय नागरिक म्हणून लाभलेल्या वारसांचा आणि त्या वारसांच्या यशाबद्दलचा अभिमान आणि कुतूहल निर्माण करणे एवढाच नसून तरुण पिढीसाठी "ज्ञानकेंद्र" म्हणून काम करणे हा देखील उद्देश आहे.

सदरच्या या डिजिटल ग्रंथालयामध्ये विविध भागातील, भाषेतील, शैलीतील तसेच विविध स्तरांवरील दर्जेदार ग्रंथांचा समावेश असून ते त्यांनी समृद्ध आहे. हे डिजिटल ग्रंथालय वापरासाठी अतिशय सुलभ अर्थातच अतिशय सोपे आहे. या डिजिटल ग्रंथालयामधील वाचनसाहित्याची अनुक्रमे ३-८, ८-११, ११-१४ आणि १४-१८ वर्षे या चार वयोगटांमधील मुलांसाठी विभागणी केलेली आहे. मुलांसाठी आणि किशोरवयीन मुलांसाठी शैक्षणिक पुस्तकांव्यतिरिक्त इतर पुस्तकांचा देखील त्यात समावेश आहे. राष्ट्रीय अंकीय ग्रंथालयातील संग्रहित या पुस्तकांमध्ये लहान मुलांसाठी तसेच किशोरवयीन मुलांसाठी कथा, तथ्यात्मक गद्यलेखन ,चरित्रे, कविता, अभिजात वाचनसाहित्य, विनोदी साहित्य, कादंबऱ्या इत्यादी प्रकारच्या वाचनसाहित्याचा समावेश आहे. या राष्ट्रीय अंकीय ग्रंथालयात इतिहास, संस्कृती, शास्त्रीय क्षेत्रातील यश, तसेच इतर महत्वपूर्ण साहित्याचा देखील समावेश आहे.

या उपक्रमासाठी एक ॲप विकसित केले गेले आहे. सदरीचे ॲप मध्ये ४६ प्रकाशकांची १००० हून अधिक 23 भाषांमध्ये पुस्तके संग्रहित केलेली आहेत. सदरील संग्रहित केलेल्या पुस्तकांची विभागणी १३ भागामध्ये केलेली आहे. हे ॲप अँड्रॉइड आणि आयओएस दोन्हीसाठी डाउनलोड करता येते त्यासाठीची लिंक खाली दिली आहे.

**Android:**https://play.google.com/store/apps/details?id=national.digital.library

**iOS:**https://apps.apple.com/in/app/rashtriya-e-pustakalaya/id6475687147

सदरील ॲप करीता कोणत्याही प्रकारची फी नाही. सदरील ॲप जास्तीत-जास्त वाचकांनी डाउनलोड करून या सुविधेचा लाभ घ्यावा. त्यानंतर त्याच ॲप वर फिडबॅक द्यावा, असे सर्वांना आवाहन करण्यात येत आहे.

14-3-24

(डॉ.डी.आर.पानगव्हाणे)

प्राचार्य,

शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय,

अवसरी खुर्द.

प्रत- १) सर्व विभागप्रमुख यांना मेल द्वारे

२) महाविद्यालयाच्या सूचनामध्ये (विद्यार्थी)